वाचले :- म. तहसिलदार शिरपूर यांचेकडील पत्र क्रमांक. गावठाण/कावि/ १०२१/८९. दिनांक ४.१२.८९ अन्वये शेवट होणारे कागदपत्रा

२] महाराष्ट्र जमिन महसूल [ सरकारी जमिनीचे विल्हेवाट ] नियम १९७१ नियम ३२ व शासन ठराव क्र. एलसीएस. १०७८/८०८०/सीआर ५०. दि. १९.४.७९.

३] मुंबई ग्राम पंचायत कायदा १९५८ चे कलम ५१- १-अ.

क्रमांक.८९/ब/कक्ष.२/गावठाण/१४२४१.
जिल्हाधिकारी कार्यालय-धुळे.
धुळे दिनांक २१ .१२.१९८९.

आ दे श :

म. चेअरमन वरूळ परिसर तेलबिया उत्पादक सहकारी सोसायटी वरूळ तालुका शिरपूर यांनी मौजे वरूळ येथील ग.नं. २/१-अ पैकी १०० x १०० क्षेत्राचा जागेची गोडावूनसाठी कब्जा हक्क रकमेवर मागणी केलेली आहे.

प्रस्तुत कामी म. तहसिलदार शिरपूर यांनी सविस्तर चौकशी करून प्रस्ताव म. उप विभागीय अधिकारी धुळे यांचे मार्फत सादर केलेला आहे.

चौकशी कागदपत्रात सोसायटीने मागणी केलेले क्षेत्र हे ग.नं.२/१-अ पैकी असून त्याचे क्षेत्र हे.९ आर४३-८-१२ इतके असून, सदरचे क्षेत्र ग्रामपंचायतीकडे विहीत केलेले आहे. सोसायटीस जागा मंजुर करणे कामी ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थांची हरकत नाही.

प्रश्नाधिन जागेची आजचे बाजार भावाप्रमाणे किंमत रू.३००=०० येते. मागणी क्षेत्र ग्रामपंचायत विहीत असल्याने ती सोसायटीस वितरण करणे-पूर्वी ग्रामपंचायत कडून काढून घ्यावी लागेल.

अशया परिस्थितीत मी जिल्हाधिकारी धुळे, मुंबई ग्रामपंचायत कायदा ~~१९५~~ १९५८ चे कलम ५१/१अ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मौजे वरूळ ता. शिरपूर येथील ग.नं.२/१अ पैकी १००x१०० क्षेत्र [प्रस्तावातील पान नं.२१ वर दर्शविल्याप्रमाणे] ग्रामपंचायत वरूळ कडून काढून घेऊन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २२ प्रमाणे गावठाणकडे वर्ग करणेचे आदेश देत आहे.

तसेच महाराष्ट्र जमिन महसूल [ सरकारी जमिनीची विल्हेवाट ] नियम १९७१ चे नियम ३२ व शासन ठराव क्र. एलसीएस. १०७८/८०८०/सीआर/५०.ग.४ दिनांक १९.४.७९ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून म. चेअरमन, वरूळ ~~ता.~~ ~~शिरपूर~~ तेलबिया उत्पादक सहकारी सोसायटी लि. वरूळ

.. २ ..

येथील ग. नं. २४१-अ पैकी १००० x १०० क्षेत्रा गोडावून बांधणेसाठीसक्लतीची कब्जा हक्क रक्कम रु. १५०/- वर नवीन शर्तीने तसेच खालील शर्तीवर मंजूर करणेचे आदेश देत आहे.

शर्ती :-

१] सोसायटीस महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्याखाली केलेले नियम यातील तरतुदींना अनुसरुन जागा मंजूर केलेली असल्यामुळे सदर नियम व तरतुदी सोसायटीस बंधनकारक राहतील.

२] सोसायटीने जागेची क.ह. रक्कम रु. १५०/- एकशे पन्नास मात्र प्रस्तुत आदेशाच्या तारखे पासून २ महिन्याचे आंत भरली पाहिजे.

३] सोसायटीने मंजूर क्षेत्राचा बिनशेती आकार दरवर्षी नियमित भरला पाहिजे.

४] सोसायटीने मंजूर क्षेत्राचा वापर फक्त गोडावून बांधणेसाठीच करावा या व्यतिरिक्त वापर केल्यास जागा मंजूरीचे आदेश रद्द करण्यात येईल.

५] म. जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय सोसायटीस मंजूर क्षेत्रा परस्पर विक्री, गहाण अगर तबदीली करता येणार नाही.

६] सोसायटीने मंजूर क्षेत्रावर दोन वर्षाचे आंत बांधकाम केले पाहिजे.

७] सोसायटीने विहित नमुन्यात कबुलायत करुन दिली पाहिजे.

८] वरील पैकी कोणत्याही एका शर्तीचा भंग झाल्यास मंजूर क्षेत्रा त्यावरील बांधकामासह सरकार जमा करण्यात येईल.

सही/-शिवाजीराव पाटील.
जिल्हाधिकारी, धुळे.

प्रति,
म. चेअरमन.
वरूळ तेलबिया उत्पादक सहकारी सोसायटी लि. वरूळ ता. शिरपूर.

जिल्हाधिकारी धुळे करिता